महाराष्ट्र शासन
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,अलिबाग, जि. रायगड.
जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, बीच रोड,अलिबाग.जि.रायगड
Email- deangmcalibag@gmail.com Phone No. 02141-299214 www.gmchalibag.in/gmch

जा.क्र.शावैमअ/आस्थापना-राजप/विनंम / जाहिरात/१८४ /२०२५ दिनांक. १४/०१/२०२५

## : जाहिरात (Walk-In-Interview):

विषय :- सहाय्यक प्राध्यापक/वरिष्ठ निवासी या संवर्गातील रिक्त असलेली पदे कंत्राटी ३६४ /१२० दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक निवड मंडळ समितीच्या शिफारसीनुसार भरण्याबाबत.

संदर्भ :- १. महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शा.नि. क्रं. एमईडी - २०१०/प्र.क्रं.७६ (अ)/२०१०/ शिक्षण - १,मंत्रालय, मुंबई दि ३१.०१.२०१२.

२. महाराष्ट्र शासन, वैद्यकिय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, शा.नि.क्रं. पदनि - २०२२/ प्र. क्रं. १०८/२०२०/वैसेवि - २,दिनांक २९.०१.२०२१

३. शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ,दिनांक ३१.०५.२०२१.

४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९/आस्था दिनांक १४.०६.२०२१.

५. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, बीसीसी-२०२१/प्र.क्रं.३८७/१६-ब(ए),दिनांक ०६.०७.२०२१.

६. मा. संचालक यांचे पत्र DMER-११०२०/८/२०२३-CETIT,दि.०७/१०/२०२३.

७. शासन निर्णय क्रमांक. एलईसी - १४२४/प्र.क्र.२२८/वैसेवा-३,दि.१८ जुलै, २०२४.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार तसेच दैनदिन रुग्णसेवेच्या व विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दष्टीकोनातून शासकीय वैद्यकिय महाविद्यालय,अलिबाग (जि-रायगड) येथील महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील सहाय्यक प्राध्यापकांची पदे ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता पात्र असलेल्या इच्छूक उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**

१. इच्छूक उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत अधिष्ठाता कार्यालयातील आवक विभागात अर्ज सादर करावा.
२. अर्जात या जाहिरातीप्रमाणे नमूद प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रांच्या साक्षकिंत व छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.
३. अर्ज आवश्यक त्या प्रमाणपत्र व कागदपत्रांसह कार्यालयात आवक-जावक विभागात सादर करुन त्याबाबतची पोच घ्यावी.

४. मुलाखतीचे ठिकाण - अधिष्ठाता कार्यालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग-रायगड, जिल्हा रुग्णालय परिसर, अलिबाग.

५. मुलाखतीची वेळ —रोज सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा. (कार्यालयीन कामकाजाचे दिवस) पर्यत राहील.

६. संबंधीत उमेदवाराने, मुळ प्रमाणपत्रांची पडताळणी करिता संबंधीत विभागप्रमुख व पडताळणी समिती यांचेकडून पडताळणी मुलाखतीच्या दिवशीच करुन घ्यावी.

७. सदर अर्जावर शेरा/अहवाल पडताळणी समितीने अधिष्ठता कार्यालयास मुलाखतीच्या दिवशीच तात्काळ सादर करावा.

८. मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे.

९. सोबत जोडलेल्या रिक्त पदांच्या तपशिलात पदांची संख्या प्रशासकीय कारणास्तव बदलण्याचे अधिकार प्रशासनास राहतील. याकरीता तपशिलात नमूद पदसंख्येत बदल (कमी/जास्त) होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

१०. तपशिलात दर्शविल्यानुसार रिक्त पदाच्या उपलब्धतेप्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येतील.

११. नियुक्तीकरिता पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या एमडी / एमएस /किंवा समतुल्य अर्हता प्राप्त परिक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. संशोधन लेख, राज्य व अखिल भारतीय स्तरावरील परिषदेतील सहभाग याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

१२. उमेदवारांची निवड करताना ज्या उमेदवारांनी शासकीय /निमशासकीय संस्थेतून बंधपत्रित सेवा पूर्ण केली आहे, त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

१३. उमेदवारांने धारण केलेल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास एक महिन्याची पूर्व सुचना देणे आवश्यक आहे. अन्यथा नोटिस न देता सहाय्यक प्राध्यापक पदाचा राजीनामा दिल्यास त्यांचे एक महिन्याचे वेतन/ मानधन शासन तिजोरीत जमा करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१४. उमेदवाराच्या विरोधात कोणत्याही प्रकारचे न्यायालयात फौजदारी खटला/प्रकरण सुरू असल्यास सदर उमेदवार या जाहिरातीसाठी अपात्र असतील व तसे आढळल्यास सदर उमेदवाराची सेवा तातडीने समाप्त करण्यात येईल.

## रिक्त पदांचा तपशिल.

| अ.क्र | विभागाचे नांव | सहाय्यक प्राध्यापक रिक्त पद संख्या | वरिष्ठ निवासी रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | शरीररचनाशास्त्र | ०१ | ०२ |
| २. | शरीरक्रियाशास्त्र | ०१ | ०२ |
| ३. | जीवरसायनशास्त्र | ०० | ०२ |
| ४. | सुक्ष्मजीवशास्त्र | ०० | ०२ |
| ५. | शरीरविकृतीशास्त्र | ०२ | ०२ |
| ६. | औषधशास्त्र | ०० | ०१ |
| ७. | न्यायवैद्यशास्त्र | ०१ | ०१ |
| ८. | जनऔषधवैद्यकशास्त्र | ०१ | ०२ |
| ९. | बालरोगचिकित्साशास्त्र | ०२ | ०२ |
| १०. | औषधवैद्यकशास्त्र | ०३ | ०४ |
| ११. | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | ०० | ०१ |
| १२. | मनोविकृतीशास्त्र | ०१ | ०१ |
| १३. | शल्यचिकीत्साशास्त्र | ०२ | ०४ |
| १४. | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | ०१ | ०१ |
| १५. | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | ०१ | ०१ |
| १६. | बधिरीकरणशास्त्र | ०३ | ०३ |
| १७. | क्ष -किरणशास्त्र | ०० | ०२ |
| | एकूण | १९ | ३३ |

**शैक्षणिक अर्हता (सहाय्यक प्राध्यापक):-** राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदव्युत्तर पदवी (एम. डी./एम. एस./डी.एन.बी.) तसेच वरिष्ठ निवासी या पदाचा एन. एम.सी. मान्यता प्राप्त (NMC Recognised /Permitted) वैद्यकिय महाविद्यालयातून एक वर्षाचा उपरोक्त संबंधित विषयाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

**शैक्षणिक अर्हता (वरिष्ठ निवासी):-** राष्ट्रीय आयुर्विज्ञान परिषद मान्यता प्राप्त विद्यापिठाची संबंधित विषयाची पदव्युत्तर पदवी (एम. डी./एम. एस./ डी.एन.बी.) असणे आवश्यक आहे.

**वेतन श्रेणी** :- प्रचलित शासकीय नियमानुसार अनुज्ञेय राहिल.

**वयोमर्यादा** :- उमेदवार **४५ वर्ष**

**मुलाखतीचे ठिकाण :-** मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अलिबाग, रायगड यांचे कार्यालय.

मुलाखतीच्या दिवशी मुळ प्रमाणपत्रे सादर करण्यात यावी. छायांकित व सांक्षाकित (प्रत्येकी एक प्रत) अर्जासोबत जोडण्यात यावी.

१. आधार कार्ड व पॅन कार्ड.

२. जन्म तारखेचे प्रमाणपत्र.

३. उमेदवाराच्या नावात बदल असल्यास गॅजेटची प्रत.

४. प्रथम,व्दितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. गुणपत्रिकांची छायकित प्रत.

५. आंतरवासिता प्रमाणपत्र.

६. एम. बी. बी.एस. पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र.

७. पदव्युत्तर परीक्षेचे गुणपत्र, उत्तीर्ण प्रमाणपत्र .

८. एम.सी.आय./महाराष्ट्र वैद्यकिय परिषदेचे नोंदणी प्रमाणपत्र तसेच नुतनीकरण प्रमाणपत्र.

९. सहाय्यक प्राध्यापक पदासाठी एक वर्ष वरिष्ठ निवासी पदाचे अनुभव प्रमाणपत्र.

१०. सहाय्यक प्राध्यापक पदाचा अनुभव असल्यास, अनुभव प्रमाणपत्राची प्रत.

(डॉ. पूर्वा पाटील)
अधिष्ठाता
शासकिय वैद्यकिय महाविद्यालय,
अलिबाग – रायगड